प्रकरण तीन

# संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन

## प्रकरण - ३

## संशोधनसमस्येशी निगडित साहित्याचे समालोचन


| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| ३.१ | प्रास्ताविक | 43 |
| ३.२ | संशोधनसमस्येशी निगडित साहित्याचे समालोचन | 44 |
| ३.२.१ | संशोधनसमस्येशी निगडित ग्रंथ स्वरूपातील व लेखस्वरूपात प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन | 45 |
| ३.२.२ | संशोधनसमस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन | 50 |
| ३.३ | समारोप | 58 |

<u>प्रकरण २</u>

# <u>संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन</u>

## २.१ <u>प्रास्ताविक</u> :

प्रस्तुत संशोधनसमस्येशी निगडित साहित्याचे समालोचन करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे संशोधकाला तुलनात्मक माहिती, उचित संशोधन पद्धती, आणि संशोधनाचे तंत्र याबद्दल निश्चित कल्पना येते.

यासंबंधी Whitney आपल्या "The Elements of Research" या ग्रंथात म्हणतात,

> "The student should find, analyse, and evaluate critically every pertinent research report dealing with his chosen problem. Anything less than this will be neither sensible nor scientific."

> "The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative data on the basis of which to evaluate and interprete the significance of one's findings. In addition, it contributes to the scholarship of the investigator... No experienced researcher would think of undertaking a study without acquainting himself with the contribution of previous investigators."[1]

संशोधित साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे देता येतील :

- निवडलेल्या विषयासंबंधी पूर्ण झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करुन त्याची पुनरावृत्ती टाळणे व योग्य संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळविणे.
- निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पध्दती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.
- संशोधन विषयासंबंधी सिध्दांत व गृहितकृत्य यांच्या मांडणीबद्दल निश्चित कल्पना प्राप्त करुन घेणे.
- आधारसामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे. समर्पक सांख्यिक तंत्र व त्याचा उपयोग आणि विवेचन करण्यासाठी मार्गदर्शन प्राप्त करणे.
- संदर्भ साहित्याचा अभ्यास करुन स्वत:ची ज्ञानसंज्ञा वाढविणे.[१२]

१.२ संशोधन समस्येशी निगडित साहित्याचे समालोचन :

संशोधन समस्येशी निगडित साहित्य दोन प्रकारचे आहे :

१) ग्रंथस्वरुपात प्रकाशित झालेले माहितीवजा व सैध्दान्तिक स्वरुपाचे साहित्य.
२) संशोधन पदवीसाठी विद्यापीठांमधून सादर केले गेलेले शोधप्रबंधाच्या स्वरुपातील साहित्य.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम ग्रंथ स्वरूपात व लेख स्वरूपात प्रकाशित झालेल्या साहित्याचे अल्पत पोळल्यात समालोचन केले आहे.

३.२.१ संशोधन समस्येशी निगडित ग्रंथ स्वरूपातील व लेख स्वरूपात प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन -

श्री. ज.गी. आपेकर यांचे "८६ चे कौतास संस्कार "[3] हे पुस्तक मूल्यशिक्षणा संबंधीतील एक महत्त्वपूर्ण पुस्तक आहे. मूल्यसंक्रमणासंबंधीत प्रामाणिकपूर्वक कर्तव्यदक्षतेने काम केलेल्या मुख्याध्यापकाने आपल्या अनुभवांचे कथन या पुस्तकामध्ये केले आहे. मूल्यसंक्रमण करीत असताना अध्यापकाने विद्यार्थ्यांच्या संदर्भात सर्वांगाने विचार करून अवधानाने कसे रहावे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सामाजिक प्रतिष्ठेला यत्किंचितही धक्का न लावता त्याच्या व्यक्तिमत्त्वातील त्रुटी कशा नाहीशा कराव्यात, त्यासाठी पालकांचे सहकार्य लागत असल्यास ते कसे घ्यावे, पालकांचे काही चुकत असल्यास त्यांनाही मार्गदर्शन कसे करावे याची आदर्श संहिता या अनुभव कथनातून मिळत राहते. प्रत्यक्ष कृतीतून आलेले अनुभव या ठिकाणी नोंद झाले असल्याने मूल्यशिक्षणासाठी हे पुस्तक मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना उपयुक्त आहे.

प्रा. ज.ग. जोशी यांच्या " नैतिक आध्यात्मिक शिक्षण : समस्यांची समीक्षा "[4] या पुस्तकाच्या " लेखकाच्या कृतज्ञता " मध्ये लेखक म्हणतात, " हा ग्रंथ म्हणजे " एकमेका करू सहाय्य, अवघे धरू सुपंथ " या भावनेने केलेले चिंतन आहे. एक प्रकारचे प्रकट चिंतन आहे....शिक्षणाद्वारे बालकांचा सात्त्विक गुणोत्कर्ष व्हावा म्हणून सर्वांना एकत्रित येण्यासाठी केलेले विनम्र आवाहन आहे. सर्व सज्जनांच्या कृपयाला घातलेली साद आहे."

या ग्रंथामध्ये लेखकाने नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची सांगड आधुनिक शिक्षणाशी कशी घालावी याचा अत्यंत सखोल व मुद्देसूद असा सर्वांगीण विचार केलेला पहावयास मिळतो. त्यामुळे अतिप्राचीन काळापासून ते अर्वाचीन काळापर्यंन्त नैतिक शिक्षणाचा विकास कसकसा होत गेला आहे अवलोकन करता येते.

प्रा. वि.ह. सहस्त्रबुध्दे यांचा ' शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन '[5] हा ग्रंथही मूल्यशिक्षणाच्या संदर्भात महत्त्वपूर्ण असा ग्रंथ आहे. समाजजीवनातील दोषांचे विश्लेषण करुन नैतिक शिक्षणाद्वारे समाज दोषमुक्त कसा करता येईल याचा वेध त्यांनी या ग्रंथामध्ये घेतलेला आहे. त्यासाठी शिक्षकाची कोणती भूमिका असली पाहिजे, दैनिक परिपाठांमधून मूल्यसंवर्धन कसे करता येईल, शाळेमध्ये वेगवेगळे कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील, मूल्यशिक्षणाचे मूल्यमापन कसे करावे या संदर्भातील मार्गदर्शन त्यांनी केलेले आहे.

' शिक्षणाच्या वाटचालविषयी '[6] हे पुस्तक येथील महाविद्या-लयातील मूल्यशिक्षण संदर्भातील उपक्रमांचे आयोजन कसे करावे याविषयीचे अनुभव कथन आहे. लेखकाने आपल्या महाविद्यालयात उपक्रमांमधून राखलेले सातत्य आणि त्यामागील त्यांची निष्ठा निश्चितच अनुकरणशील आहे.

प्रा. रा.तु. भगत यांनी संपादित केलेले ' आजच्या शिक्षणातील विचारप्रवाह '[7] हे पुस्तक येथील मान्यवरांचे मूल्यशिक्षणविषयक विचार जाणून घेण्यास उपयुक्त आहे. ' शिक्षण : समाज सुधारण्याचे साधन ' या डॉ. ग.श्री. खैर यांच्या लेखातून व्यक्तीच्या वाणीतून आणि कृतीतून सदाचार व्यक्त व्हावा आणि व्यक्ती सदाचारी बनून तिचे आणि पर्यायाने संपूर्ण समाजाचे जीवन मंगलमय व्हावे या संदर्भातील विचार त्यांनी

मांडलेले आहेत. वि.वि. चिपळूणकरांचा ` शिक्षणाचे पंचप्राण ` हा लेख प्रेमाने प्रेम वाढवू या, यशाने यश मिळवू या, विश्वासाने विश्वास वाढवू या, संपर्कातून संपर्क वाढवूया, व स्वयंमूल्यमापनातून स्वयंविकासाप्रत जाऊ या हा शिक्षण पंचसूत्रीचे विश्लेषण करणारा आहे.

` शिक्षण आणि संस्कार ` हा यदुनाथ थत्ते यांचा लेख संस्कारस्वरूप आकलन घेण्यासाठी महत्वपूर्ण आहे. ` नैतिक शिक्षण ` हा गो.के. मान्नावकर यांचा लेखही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होत असताना योग्य त्या अभिवृत्ती विद्यार्थ्यांमध्ये कशा जोपासाव्यात या संदर्भात मार्गदर्शन करणारा आहे. ` आचार्य कुल : एक शाश्वत शैक्षणिक विचार ` हा प्र.द. पुराणिक यांचा लेखही विनोबाजींच्या ` आचार्य कुल ` कल्पनेचे अधिक स्पष्टीकरण करणारा आहे.

डॉ. रा.भा. देवस्थळी यांचा ` विद्यार्थी मित्रांनो `[८] हा ग्रंथ त्यांनी शिक्षणशास्त्र विषयातील विविध विषयांवर दिलेल्या भाषणांचे संकलन आहे. या ग्रंथातील ` मूल्यांचे मानवी जीवनातील स्थान ` हे भाषण मूल्यशिक्षणाची अत्यावश्यक गरज जशी लक्षात आणून देते तसेच मानवी जीवनातील मूल्यांचे महत्व विशद करते. मूल्यस्वरूपाबद्दलची भूमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने हे भाषण अत्यंत महत्वाचे आहे.

श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर या संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त संस्थेच्या प्राचार्यांनी संपादित करून प्रकाशित केलेला ` मूल्यशिक्षण `[९] विशेषांकही मूल्यशिक्षणा-संदर्भात महत्वाचा आहे. पाठ्यपुस्तकातील मूल्यांचा शोध घेऊन ती विद्यार्थ्यांमध्येच कशी बिंबवावीत यासाठी तयार केलेले सरावपाठ या विशेषांकामध्ये समाविष्ट आहेत. मूल्यशिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाठनियोजन कसे करावे याचे मार्गदर्शनही या विशेषांकामध्ये पहावयास मिळते.

विविध शिक्षण आयोग आणि शिक्षण मंडळे यांच्या नैतिक शिक्षणाच्या संबंधातील शिफारशींचा आढावा घेऊन एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली ने "Documents on Social, Moral and Spiritual Values in Education (1979)".[10] या पुस्तिकेमध्ये ८४ मूल्यांची यादी दिलेली आहे. मूल्यस्वरूपासाठी ती अतिशय महत्त्वाची आहे.

डेहराडून येथील डी.ए.व्ही.कॉलेजमध्ये जून १९८८ ला महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीवर मूल्य शिक्षण अध्यापन पध्दती व तंत्र या संबंधात घेण्यात आलेल्या कृतिसत्रामध्ये वाचले गेलेले निबंध या दृष्टीने महत्त्वाचे आहेत.[११]

1) Dr. Dewasthalee R.B.

   1. Significance of Value System in Human Life.

   2. The Contain of Value Education in a Pluralistic Society.

2) Dr. Kulshrestha S.P.

   1. Values through ages.

   2. Value clarification strategies

   3. Philosophical, Psychological and Sociological concept of values

3) Dr. Atrey J.P.

   Values and their Educational Significance.

4) Dr. Rahinwala D.N.

   Traditional Method of Teaching of values.

5) Dr. Ahluwalia S.P.

   Inculcating Values among students, Teachers; some suggestions.

6) Dr. Singh Ajit

Inculcating Values Search for Strategies

(Papers presented in the All India Workshop on Method and Technology of Teaching Values at College and University Level at D.A.V. (PG) College, Dehradun, June 1 to 28, 1988.

डॉ. म.गो. देशपांडे यांनी ` मनोरंजनात्मक संस्कार भाग १ ते ३ `[१२] या पुस्तिका कुमार वयोगटातील संस्कारशील विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनासाठी लिहिलेल्या आहेत. प्रसिध्द व्यक्तींच्या जीवनातील संस्कारांनीयुक्त अशा घटनांचे वर्णन आपल्या रसाळ भाषेतून त्यांनी केले आहे. अवांतर वाचनासाठी ह्या पुस्तिका विद्यार्थी व अध्यापक यांना महत्त्वपूर्ण अशा आहेत.

याच लेखकाने ` मुलांचे तत्त्ववेत्ते भाग १ ते १४ `[१३] मधून कुमारांसाठी श्रीकृष्ण, शंकराचार्य, भीष्म, गौतमबुध्द, महावीर, गुरुनानक, जे.कृष्णमूर्ती, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, लाओत्से व कन्फ्युशिअस, हेराक्लिटस, झरथुष्ट्र, महंमद पैगंबर या धर्मसंस्थापकांची व तत्त्ववेत्त्यांची त्यांच्या जीवनचरित्राची ओळख प्रत्येक पुस्तिकेतून थोडक्यात करून दिली आहे. सर्वधर्मसमभाव निर्माण होण्याच्या दृष्टीने यासारख्या पुस्तिका अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

या सर्व ग्रंथांचे व मूल्यांसंबंधीत व प्रकाशित झालेल्या लेखांचे समालोचन केले असता एक गोष्ट लक्षात येते की, ९ वी, १० वीच्या (माध्यमिक स्तरावरील) प्रथम भाषा मराठीच्या पाठ्यपुस्तकांतून प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचे विद्यार्थ्यांमध्ये संक्रमण कसे करायचे त्या मागील अडचणी कोणत्या या संदर्भात अद्यापि संशोधन झालेले नाही. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला हा विषय मूलगामी आणि नवीन असा आहे.

### २.२.२ संशोधन समस्येशी निगडित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन :

वरील परिच्छेदातून ग्रंथत्याने तसेच लेखत्याने प्रकाशित झालेल्या साहित्याचे समालोचन केले. पुढील परिच्छेदातून संशोधन समस्येशी संबंधित असलेल्या संशोधित साहित्याचे समालोचन केलेले आहे.

प्रस्तुत विषयाशी संबंधित संशोधनाच्या अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधकाने पुढील ग्रंथांचे अवलोकन केले :

१) दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशनल रिसर्च, एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली.
२) दि सर्वे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, संपादन डॉ.एम.बुच, सेंटर ऑफ अॅडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि एम.एस. युनिव्हर्सिटी, बरोडा.
३) एज्युकेशन इन्व्हेस्टीगेशन इन इंडियन युनिव्हर्सिटीज (१९३९-१९६१), एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली.
४) एज्युकेशन इन्व्हेस्टीगेशन इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र (१९३९-१९७०), स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे-३०.
५) दि सेकंड सर्वे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९७२-१९७८), संपादक डॉ. एम.बी. बुच, सोसायटी फॉर एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट, बरोडा.
६) एज्युकेशनल रिसर्च इन दि युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, संपादिका डॉ.(सौ.) प्रतिमा देव, डिपार्टमेंट ऑफ एज्युकेशन, युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, १९८१.

७) एज्युकेशनल रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र, प्लॅटिनम ज्युबिली इयर व्हाल्युम, संपादक डॉ. एन.के. पाटोळे, एस.टी. कॉलेज, बॉम्बे (मुंबई), १९८३.

८) भाषा व साहित्य : संशोधन (आवृत्ती १९८१) संपादक डॉ. यशवंत स. बोरसे, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे-३०.

९) ॲबस्ट्रॅक्ट्स ऑफ डॉक्टरल रिसर्चस् इन एज्युकेशन संपादक डॉ. एस.बी. पांडे, डॉ. एम.बी. कुंडले (नागपूर : सेक्रेटरी, शिक्षण समीक्षा मंडळ, १९८७)

वरील ग्रंथाव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्यावतीने प्रसिध्द होणारे ` रिसर्च बुलेटिन ` या त्रैमासिकाचे सर्व अंक त्याचप्रमाणे असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्यावतीने प्रकाशित होणाऱ्या ` युनिव्हर्सिटी न्यूज ` या साप्ताहिकातील ` थिसिस ऑफ द मंथ ` या सदराखाली प्रसिध्द होणाऱ्या विद्यापीठांनी स्वीकृत केलेल्या प्रबंधाची नावे पाहली.

वरील ग्रंथांचे काळजीपूर्वक अवलोकन करुन प्रस्तुत संशोधनाशी संबंधित जे संशोधन झालेले आहे त्याचा आढावा पुढील परिच्छेदातून घेतलेला आहे.

**Haamul Haq (1973)**[14] यांनी भारतीय राज्यघटनेत नोंद झालेली आधुनिक राजकीय मूल्ये आणि शाळेतील क्रमिक पुस्तकातील पाठ्यांशामधून बिंबविण्याची मूल्ये यांचा संबंधाचा अभ्यास केलेला आहे. यासाठी त्यांनी दिल्लीतील शाळांमधील विशेषत: हिंदी, इंग्रजी, इतिहास, नागरिकशास्त्र या क्रमिक पुस्तकांच्या पाठ्यांशाचे वर्गीकरण विश्लेषण केले आहे. त्यांना मिळालेले निष्कर्ष खालील प्रमाणे

क्रमिक पुस्तकातील मूल्यांचे सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा ( Pattern ) किंवा Consistency (सातत्य) राखले गेलेले नाही.

मूल्यांचे स्वरूप आणि विद्यार्थ्यांची मानसिक परिपूर्णता (क्षमता) यांच्यामधील संबंध योग्य नाहीत.

विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये समान वयोगटाच्या व मानसिक पातळीच्या बाबतीत युनिफॉर्मिटी राखली गेलेली नाही.

विद्यार्थ्यांच्या वर्गामध्ये समान वयोगटाच्या व मानसिक पातळीच्या बाबतीत सारखेपणा राखला गेला नाही.

प्राथमिक स्तरावरील मराठीची पुस्तके काही अंशी मूल्ये संक्रमित करण्यास उपयुक्त ठरतील असे वाटते पण ९ वी, १० वी, ११ वीची क्रमिक पुस्तके पूर्णांशाने वाङ्‌मयीन ( Literary ) दृष्टिकोनातून लिहिली गेलेली आहेत.

ज्या पुस्तकातून राजकीय मूल्ये संक्रमित करायची आहेत असे आपण अपेक्षा करतो त्या नागरिकशास्त्राच्या पुस्तकातूनही मूल्यांसंदर्भात जाणीव-पूर्वक व सातत्यपूर्ण प्रयत्न केले गेलेले नाहीत.

मानसिक परिपूर्णतेच्या (क्षमतेच्या) तत्त्वानुसार पहिली ते अकरावीच्या निरनिराळ्या क्रमिक पुस्तकातून निरनिराळी राजकीय मूल्यांवर अधिक भर दिला गेलेला नाही.

शिक्षणाच्या समाजशास्त्राचा [illegible] अभ्यास करीत असताना श्री. गोरे (१९७०)[१५] यांनी जे संशोधन केले आहे त्याचा निष्कर्ष पुढे दिला आहे.

राष्ट्रीय संस्कृतीची प्रतिके म्हणून आपण क्रमिक पुस्तकांकडे पाहू शकतो. इतर कोणत्याही साधनापेक्षा राष्ट्रीय उद्दिष्टे व मूल्ये रुजविण्यासाठी क्रमिक पुस्तके ही महत्वाची साधने आहेत. भारतातील सामाजिक तत्वप्रणालीमध्ये जर उदारमतवादी लोकशाही व शास्त्रीय तंत्रज्ञान ही जर मूल्यांची महत्वाची उगमस्थाने गृहित धरली तर शिक्षण पध्दतीनेही आपल्या कृतीतून आणि पध्दतीतून त्यांचा वापर केला पाहिजे. जर आपण आपल्या कृतीतून आणि पध्दतीतून बुध्दिनिष्ठ आणि ऐक्याची लोकशाही समाज अपेक्षित असेल तर बुध्दिनिष्ठ ऐक्यभाव व समता यांना शिक्षण-प्रक्रियेमध्ये देखील योग्य स्थान मिळाले पाहिजे. त्यांना क्रमिक पुस्तकातून व अवांतर वाचनासाठी असलेल्या पुस्तकातून योग्य स्थान दिले गेले पाहिजे.

Keasey (1971)[16] ने असा निष्कर्ष काढला की, सामाजिक कार्यामधील सहभाग हा व्यक्तीच्या नैतिक विकासाचा परिपाक आहे. जितका नैतिक विकास अधिक असेल तितक्याच अधिक प्रमाणात त्या व्यक्तीचा सामाजिक कार्यामध्ये अधिक सहभाग असेल.

Moir (1974)[17] च्या मते नैतिक विकास व्यक्तीच्या अंगी विविध अडचणी-या पार पाडण्याचे सामर्थ्य निर्माण करत असतो.

प्रा. यु.एस. चौधरी व प्रा. बी.ए. शर्मा यांनी एन.सी.ई.आर.टी.ने तयार केलेली राष्ट्रीय पातळीवरील पहिली ते आठवीची हिंदीची क्रमिक पुस्तके व मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाने तयार केलेली १ ली ते ८ वीची हिंदी पुस्तके यांचा या पुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास केला आहे. हे संशोधन त्यांनी एम.एड्.साठी शोधप्रबंध म्हणून इंदौर विद्यापीठामध्ये १९७४ साली सादर केले आहे.[१८]

संशोधनातून त्यांना मिळालेले निष्कर्ष पुढे दिले आहेत :

एन.सी.ई.आर.टी.च्या क्रमिक पुस्तकातून शौर्य आणि साहस या मूल्यांवर सर्वाधिक भर दिलेला आहे.

मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाच्या क्रमिक पुस्तकांमध्ये ` देशप्रेम ` या मूल्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे.

एन.सी.ई.आर.टी. व मध्य प्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाच्या क्रमिक पुस्तकांमधून मूल्यांच्या सादरीकरणामध्ये बरेच साम्य असले तरी एन.सी.ई. आर.टी.च्या क्रमिक पुस्तकांमधून त्याग, परमेश्वरावरील श्रध्दा, आज्ञाधारकपणा या मूल्यांवर कमी भर दिलेला दिसून येतो, तर मध्यप्रदेश क्रमिक पुस्तक मंडळाच्या पुस्तकांमध्ये सहकार्य व Compassion या मूल्यांवर कमी भर दिलेला आढळून येतो.

मध्यप्रदेशाच्या राष्ट्रीय ( Nationalised ) १ ली ते ८ वीच्या हिंदी क्रमिक पुस्तकांचे मूल्यमापन प्रा. चौधरी यु.एस. यांनी केले आहे. हे संशोधन त्यांनी इंदौर विद्यापीठामध्ये ` वाचस्पती ` (पीएच.डी.) साठी सादर केले आहे. (१९७५)[१९] त्यांना संशोधनातून मिळालेले निष्कर्ष खालीलप्रमाणे :

` देशभक्ती ` या मूल्याला क्रमिक पुस्तकामध्ये अधिक महत्व दिले असून ` शास्त्रीय दृष्टिकोना ` ला अल्प महत्व दिलेले आहे.

Compassion, Industry, (उद्यम) ` धैर्य आणि प्रेम ` या मूल्यांना १ ली ते ४ थीच्या क्रमिक पुस्तकांतून जास्त महत्व दिले असून ५ वी ते ८ वीच्या क्रमिक पुस्तकातून प्रेम, Compassion , धैर्य आणि समानता यांना अधिक महत्व दिलेले आहे.

पहिली ते पाचीच्या क्रमिक पुस्तकांतून स्वच्छता, सत्य, humbleness अहिंसा, त्याग आणि स्वातंत्र्य याना सर्वसाधारणत: जास्त महत्व दिलेले आहे. तर ५ वी ते ८ वीच्या क्रमिक पुस्तकांतून सत्कार्य, humbleness त्याग, निधर्मीपणा, आंतरराष्ट्रीय सामंजस्य यांना सर्वसाधारण जास्त महत्व दिलेले आहे.

१ ली ते ५ वीच्या क्रमिक पुस्तकातून आरोग्य ( Health ), शास्त्रीय दृष्टिकोन, निधर्मीपणा, न्याय, आंतरराष्ट्रीय सामंजस्य व साधी राहणी याना अल्प महत्व दिलेले आहे.

५ वी ते ८ वीच्या क्रमिक पुस्तकातून शास्त्रीय दृष्टिकोन, न्याय, साधी राहणी, अहिंसा, कर्तव्यजाणीव याना अल्प महत्व दिलेले आहे.

पाठ्यपुस्तकातील मूल्यांच्या सादरीकरणामध्ये विशिष्ट असा साचा किंवा सातत्य नाही.

Yeager (1979)[20] यानी आपल्या संशोधनात Kohlberg च्या सिध्दांताचा उपयोग केला. यामध्ये वर्गाध्यापनाच्या पध्दती व त्या विषयांच्या आशयांचा प्रामुख्याने समावेश आहे.

Ries (1981)[21] यांच्या संशोधनाचा मुख्य उद्देश हा होता की, विशिष्ट शैक्षणिक अभ्यासक्रमाचा नैतिक विकास साधण्याच्या दृष्टीने कसा उपयोग करता येईल.

Garrold (1982)[22] च्या प्रबंधामध्ये उच्चमाध्यमिक पातळी-वरील इंग्रजीचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील नैतिक विकास घडवून आणण्यास कितपत साहाय्यभूत होईल याचा विचार करण्यात आलेला आहे.

Harvey Patricia Lawson (1983)[23] ने विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष सहभाग (विविध उपक्रम) आणि त्या उपक्रमांबद्दल त्यांचे विचार यांची त्यांच्या नैतिक विकासाशी सांगड घालण्याचा प्रयत्न करून काही निष्कर्ष काढलेले आहेत.

Bailey (1985)[24] यांनी प्राथमिक शिक्षकाची अध्यापनाच्यावेळी सहनशीलता (विशेषत: गैरवर्तणूक करणाऱ्या मुलांना अध्यापन करताना) आणि अशा विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासासंबंधी संबंधित शिक्षकाचे अंदाज यांचा विचार केला आहे. त्यांनी असे प्रतिपादन केले की सहनशीलतेची पातळी आणि स्वरूप हे त्या त्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या नैतिक विकासाच्या पातळीवर अवलंबून असते.

प्रा. एन.एस. सावंत यांनी " इ. १ ली ते ४ थी च्या भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा चिकित्सक अभ्यास करणे व या वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत यासंबंधी शिफारसी करणे " या विषयावर संशोधन केलेले आहे.[२५]

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे -

१) इयत्ता १ ते ४ च्या भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकांचा चिकित्सक अभ्यास करणे आणि या पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा शोध घेणे.

२) इ. १ ते ४ या वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत याबाबत संबंधित वर्गांना शिकविणाऱ्या अध्यापकांच्या मतांचा शोध घेणे.

३) इयत्ता १ ते ४ मधील वयोगटाच्या विद्यार्थ्यांवर कोणती मूल्ये बिंबवावीत यासंबंधी शिफारसी करणे.

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला गेला असून त्यासाठी प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

<u>निष्कर्ष</u> :

प्रस्तुत पाठ्यपुस्तकात विविध पाठातील विषयात संस्कारांच्या दृष्टीने विविधता आढळते.

धर्माचा व मूल्यांचा निकटचा संबंध आढळून येतो.

पाठ्यपुस्तकातील पाठ्यांश राष्ट्रीय व भावनात्मक ऐक्याला बाधक ठरणार नाही.

मूल्ये परिणामकारक बिंबविण्यासाठी अभ्यासक्रमात बदल करण्याची आवश्यकता वाटते.

इयत्ता १ ली ते ४ थीच्या भाषा विषयाच्या पाठ्यपुस्तकाद्वारे सत्य, ममता, बंधुभाव, सहकार्य, सेवा, प्रेमभाव, ऐक्य आदी चिरंतन मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न झालेला आहे.

इयत्ता ४ थीच्या इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून स्फूर्ती व प्रेरणा मिळते, त्याशिवाय शिवरायांची मातृभक्ती, पितृभक्ती, राष्ट्रभक्ती, मित्रप्रेम व धर्मनिष्ठा इ. मूल्ये बिंबविण्याचा प्रयत्न चांगला केला आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तके अहिंसावादी दृष्टिकोन निर्माण करत नाहीत. व भ्रष्टाचाराचा उच्छेद करण्यासाठी झुंजण्याची प्रेरणा देत नाहीत.

प्रत्यक्ष कृती किंवा वर्तन केल्याशिवाय मनावर मूल्ये बिंबविली जाऊ शकत नाहीत. इतिहास, भूगोल या पाठ्यपुस्तकामध्ये प्रत्यक्ष कृती करण्यास फारशी संधी उपलब्ध झालेली दिसत नाही.

भाषा, इतिहास व भूगोल या पाठ्यपुस्तकात लोकशाही एक जीवनपद्धती ही वृत्ती दृष्टीगत होईल, अशी संधी प्राप्त झालेली नाही.

अलंकार कमविण्यासाठी कर्मनिष्ठा व कलानिष्ठा ही मूल्ये दृष्टीगत होण्यासाठी काही सुधारणा होणे गरजेचे आहे.

२.४ समारोप :

हा आढावा प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे संशोधकाला उपयुक्त ठरला. हा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर आणखी एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की अद्यापि माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांच्या कल्पनासंबंधीत स्वतंत्रपणे संशोधन झालेले नाही. प्रस्तुत संशोधन हे म्हणूनच मुलाभी आणि नवीन ठरते.

संशोधन समस्येशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित आणि संशोधित साहित्याच्या समालोचनानंतर पुढील प्रकरण क्रमांक ४ मध्ये माध्यमिक स्तरावरील मराठीच्या पाठ्यपुस्तकातून (कुमारभारती इयत्ता ९ वी, इयत्ता १० वी) प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्यांचे वर्गीकरण व विश्लेषण केले आहे.

## संदर्भ सूची


१) Whitney, F.L., Elements of Research, Prentice Hall Inc. N.Y., 1954, pp. 98-112.

२) मुळे रा.श., उमाठे वि.तु., शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, प्र.आ. १९७७, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, पृ. ७९.

३) दापेकर ल.नी., अशी होतात संस्कार, नागपूर : मौठ प्रकाशन, १९८१.

४) जोशी अ.द., नैतिक आध्यात्मिक शिक्षण : समस्याची समस्या, औरंगाबाद : परिमल प्रकाशन, पुनर्मुद्रण, फेब्रुवारी १९८९.

५) सहस्रबुद्धे वि.द., शिक्षणातून नैतिक मूल्यसंवर्धन, पुणे : साधना प्रकाशन, प्र.आ. १९८४.

६) नाडकर्णी म.द., शिक्षणाच्या वास्तवदिशा, मुंबई : ललित नाट्य प्रकाशन, १९८७.

७) भात रा.तु. (संपादक), आजच्या शिक्षणातील विचार प्रवाह, कोल्हापूर : चैतन्य प्रकाशन, १९८२.

८) देवस्थळी रा.मा., विद्यार्थी मित्रांनो, कोल्हापूर : रश्मिम प्रकाशन, १९८९.

९) पाटील लीला (संपादक), मूल्यशिक्षण - श्री महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय सुवर्णमहोत्सव विशेषांक, कोल्हापूर, १९८४

10) Goyal B.R., Documents on Social, Moral and Spiritual Values in Education, New Delhi, N.C.E.R.T., 1979.

11) Papers presented in the All India Workshop on Method and Technology of Teaching Values at College and University level at D.A.V. (P.G.) College, Dehradun : June 1 to 28, 1988.

१२) देशपांडे प.गो., मनोविकासातून संस्कार, भाग १ ते ३, कोल्हापूर : रश्मिम प्रकाशन, १९८३.

१३) देशपांडे प.गो., मुलांचे तत्त्ववेत्ते, भाग १ ते १४, कोल्हापूर : रश्मिम प्रकाशन, १९८४.

14) Ehsanul Haq, Educational and Political Modernisation : An Analysis of School Text-books in Delhi, NIE Journal May, 1973 7(5), 19-25.

15) Gore, M.S. et. al., Field Studies in the Sociology of Education, New Delhi : N.C.E.R.T., 1970.

16) Keasey C.M., 'Experimentally induced change in moral Opinions and Reasoning', Journal of Personality and Social Psychology, 26, 30-38, 1973.

17) Moir D.J., 'Egocentrism and the Emergence of Conventional Morality in Preadolescent girls', Child Development, 45, 299-304, 1974.

18) Choudhari, U.S. and Sharma B.N. : A Comparative Study of Values Reflected in National and State Level Hindi Text-Books, M.Ed. Dissertation, Indore : University of Indore, 1974.

19) Choudhari, U.S. : An Evaluation of Nationalised Hindi Text-Books of Madhya Pradesh, Ph.D. Thesis, Indore : University of Indore, 1975.

20) Yeager, Barbara, Devonna, Virginia Polytechnic Institute and State University, Moral Development and Children's Literature, Abstract, International, Vol. 44, 1984.

21) Ries, Steven, I., Harvard University, An Empirical Study of an Educational Intervention Curriculum and its facilitative effect upon moral development. Abstract, International, Vol. 44, 1984.

22) Garrold, Andrew Carruthers, Ed. D. Harward University, A Developmental Approach to the Teaching of Literature, A context for moral and ego growth adolescents, Dissertation, Abstract, International, Vol. 45, 1984.

23) Harvey, Patricia, Lawson, Ph.D. University of Maryland, Moral Development and Residence Hall Vandalism. Dissertation Abstract , International. Vol. 44, 1984.

24) Bailey, Deborah nn, Ph.D. University of Missouri Columbia, The Relationship between stages of Moral Judgement and Elementary class-room Teacher's perceptions of Distrurbing Behaviour, Dissertation Abstract, International, Vol. 46, 1986.

२५) भारतीय शिक्षण - जुलै १९८९, सावंत एम.एन., पाठ्यपुस्तकात प्रतिबिंबित झालेल्या मूल्यांचा अभ्यास, अनुक्रम १८, पृ.क्र. २६९.